रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
वर्ष १६ अंक ७७
www.ramprahar.com
बुधवार, ४ ऑक्टोबर २०२३ ♦ पाने ८ ♦ किंमत ₹ २

## शिवडी-न्हावा शेवा पुलापासून विमानतळापर्यंत सागरी किनारा मार्ग



**मुंबई :** शिवडी-न्हावा शेवा सागरी सेतूपासून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला थेट जोडणारा सात किलोमीटर अंतराचा नवा सागरी किनारा मार्ग उभारण्याचा निर्णय सिडकोने घेतला असून महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाने या महत्त्वाकांक्षी प्रकल्पास हिरवा कंदील दाखविल्याने या मार्गातील पूल उभारणीसाठी आवश्यक निविदा प्रक्रिया सिडकोने सुरू केली आहे. शिवडी-न्हावा शेवा पुलावरून उलवे भागातील शिवाजीनगर येथे एक मार्गिका सोडण्यात आली आहे. या मार्गिकेवरून संपूर्ण उलवे उपनगराला खाडीच्या बाजूने समांतर असा हा किनारा मार्ग थेट विमानतळाच्या दिशेने नेण्यात येणार आहे. नेरूळ-उरण रेल्वे मार्गिकेवरून या मार्गाची उभारणी केली जाणार आहे. उलवे ते जेएनपीटी हा सागरी मार्ग सात किमी लांबीचा असणार असून त्यावर सहा मार्गिका असतील.

### अंतरंग
'वर्ल्ड ट्रेड एक्स्पो'मध्ये विविध देशांचा सहभाग/२
ई-कचरा संकलन मोहिमेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद/३
भाजपमुळेच गीते खासदार झाले होते -खासदार तटकरे/५

# राज्यात ग्रामपंचायतींची रणधुमाळी

## २३५९ ठिकाणी सार्वत्रिक निवडणूक जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या राज्यातील ग्रामपंचायतींच्या निवडणुकीचे बिगुल अखेर वाजले आहे. राज्यभरातील सुमारे दोन हजार ३५९ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आणि दोन हजार ९५० सदस्यपदाच्या; तर १३० सरपंचांच्या रिक्तपदांच्या पोटनिवडणुकीसाठी ५ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे, अशी घोषणा राज्य निवडणूक आयुक्त यू.पी.एस. मदान यांनी मंगळवारी (दि. ३) केली. संबंधित ग्रामपंचायतींच्या क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली आहे.



ग्रामपंचायत निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्रे १६ ते २० ऑक्टोबर या कालावधीत दाखल करता येतील. नामनिर्देशनपत्रांची छाननी २३ ऑक्टोबर रोजी होईल. नामनिर्देशनपत्रे २५ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत मागे घेता येतील. त्याच दिवशी निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात येईल. ५ नोव्हेंबर रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान आणि मतमोजणी ६ नोव्हेंबरला होईल, मात्र गडचिरोली व गोंदिया या नक्षलग्रस्त भागात सकाळी ७.३० ते दुपारी ३ वाजेपर्यंतच मतदानाची वेळ असेल. तेथे ७ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होईल, असे निवडणूक आयुक्त मदान यांनी सांगितले.

अनेक जिल्ह्यांतील ग्रामपंचायतींची मुदत संपली आहे, तर काही ठिकाणी पोटनिवडणूक प्रस्तावित आहे. त्यामुळे राज्यात राजकीय रणसंग्राम रंगणार आहे.

**रायगड जिल्ह्यात २१० ग्रामपंचायतींची निवडणूक/२ वर..**

## दिवाळीनिमित्त शंभर रुपयांत आनंदाचा शिधा

### मैदा, पोह्याचादेखील समावेश

**मुंबई : प्रतिनिधी**




दिवाळीनिमित्त शिधापत्रिकाधारकांना शंभर रुपयांत आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय मंगळवारी (दि. ३) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या शिध्यात आता मैदा आणि पोह्याचादेखील समावेश करण्यात आला आहे. पूर्वी आनंदाचा शिधा या संचात रवा, चनाडाळ, साखर आणि खाद्यतेल असे चार जिन्नस होते. यामध्ये दोन जिन्नसांची भर पडली आहे.

राज्यातील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारक तसेच छत्रपती संभाजीनगर व अमरावती विभागातील सर्व जिल्हे आणि नागपूर विभागातील वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील दारिद्र्यरेषेवरील केशरी शेतकरी अशा एक कोटी ६६ लाख ७१ हजार ४८० शिधापत्रिकाधारकांना हा आनंदाचा शिधा मिळेल.

यामध्ये एक किलो साखर, एक लिटर खाद्यतेल तसेच प्रत्येकी अर्धा किलो रवा, चनाडाळ, मैदा आणि पोहे यांचा समावेश असेल. हा आनंदाचा शिधा २५ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबरपर्यंत वितरित करण्यात येईल. यासाठी येणाऱ्या एकूण ५३० कोटी १९ लाख इतक्या खर्चासदेखील या वेळी मान्यता देण्यात आली.



# पनवेलच्या हरिग्राममध्ये शेकापला धक्का

- सरपंच निर्मला वाघमारे कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये
- आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले सर्वांचे स्वागत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शेतकरी कामगार पक्षाला पनवेल तालुक्यात पुन्हा एकदा जोरदार धक्का बसला असून हरिग्राम ग्रामपंचायतीच्या सरपंच निर्मला रामदास वाघमारे यांनी कार्यकर्त्यांसह मंगळवारी (दि. ३) भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. या सर्व प्रवेशकर्त्यांचे भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी पक्षाची शाल देऊन भाजपमध्ये स्वागत केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल मतदारसंघाचा वेगाने विकास होत आहे. या विकासगंगेत विविध पक्षांचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी होत आहे. त्यानुसार शेकापला जोरदार धक्का देत हरिग्राम ग्रामपंचायतीच्या सरपंच निर्मला वाघमारे यांनी कार्यकर्त्यांसह भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विकासाचे 'कमळ' हाती घेतले.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पनवेल येथील निवासस्थानी झालेल्या या कार्यक्रमात सरपंच निर्मला वाघमारे, रामदास वाघमारे, तुकाराम वाघमारे, भास्कर वाघमारे, दत्ता वाघमारे, गुरूनाथ वाघमारे, पांडुरंग वाघमारे, मधुकर वाघमारे, कैलास वाघमारे, अनंता वाघमारे, जनार्दन वाघमारे, जयराम कातकरी, विठ्ठल वाघमारे, रमेश वाघमारे, सन्नी वाघमारे, अर्जुन वाघमारे, गणेश वाघमारे, महेश वाघमारे, संगीता वाघमारे, बेबी पारधी, शुभम वाघमारे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. **(पान २ वर..)**

## रजनीश सेठ एमपीएससी आयोग अध्यक्षपदी

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे पोलीस महासंचालक रजनीश सेठ यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. किशोर दत्तात्रय राजे-निंबाळकर सेवानिवृत्त झाल्यानंतर हे पद रिक्त होते.

दरम्यान, राज्याच्या पोलीस महासंचालकपदी रश्मी शुक्ला यांची नियुक्ती होण्याची शक्यता आहे. तसे झाल्यास त्या राज्याच्या पहिल्या महिला पोलीस महासंचालक ठरतील. सध्याचे पोलीस महासंचालक रजनीश सेठ यांना एमपीएससीच्या अध्यक्षपदी नियुक्त करण्यात आले आहे.

## नांदेडनंतर छत्रपती संभाजीनगरात २४ तासांमध्ये १० रुग्णांचा मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

नांदेडच्या घटनेनंतर छत्रपती संभाजीनगर शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय म्हणजेच घाटी रुग्णालयात २४ तासांत १० रुग्णांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये दोन बालकांचा समावेश आहे.

यावर प्रशासनाने स्पष्टीकरण देत औषधाच्या तुटवड्याने किंवा डॉक्टरच्या कमतरतेने, हलगर्जीपणामुळे हे मृत्यू झाले नसल्याचा दावा केला आहे. यामध्ये बहुतेक मृत्यू झालेले रुग्ण बाहेरून रेफर केलेले होते किंवा मरणासन्न अवस्थेत रुग्णालयात दाखल झाले होते, असे रुग्णालयाचे डीन व अधिष्ठाता संजय राठोड यांनी सांगितले. या रुग्णालयात फक्त संभाजीनगरच नव्हे; तर मराठवाड्यातून आणि बाहेरूनही रुग्ण येतात. त्यामुळे मृत्यूचे प्रमाण जास्त आहे. मृत्यूचे समर्थन नाही, मात्र गंभीर अवस्थेत रुग्ण येत असल्यानेच मृत्यू होत असल्याचेही ते म्हणाले.



### केंद्राकडूनही दखल

**नवी दिल्ली :** केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री भारती पवार यांनी नांदेड जिल्हा रुग्णालय प्रशासनाला अहवाल देण्याचे आदेश दिले आहेत. त्या म्हणाल्या की, नांदेड रुग्णालयातील घटना अत्यंत दुर्दैवी असून संबंधित अधिकाऱ्यांशी बोलणे झाले असून त्या बाबतीत खुलासा मागवला आहे. नेमके कोणते पेशंट होते? कधी अॅडमिट झाले होते? ही सर्व माहिती मागविण्यात आली असून नांदेडसह संभाजीनगरमधील रुग्णांच्या मृत्यू प्रकरणाची केंद्राकडून दखल घेण्यात आली असून लवकरच सविस्तर अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल.

### घटनेची चौकशी करून कारवाई करणार : मुख्यमंत्री

**मुंबई :** नांदेडमधील घटना सरकारने गांभीर्याने घेतली असून या घटनेची चौकशी करण्यात येणार आहे. चौकशी झाल्यानंतर त्यावर योग्य ती कारवाई करणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. नांदेडमधील घटनेच्या ठिकाणी मंत्री हसन मुश्रीफ आणि गिरीश महाजन हे पोहचले असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी मंगळवारी (दि. ३) सांगितले.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, नांदेडच्या घटनेची चौकशी सुरू आहे. त्या ठिकाणी औषधांची कोणतीही कमतरता नव्हती. औषधांसाठी १२ कोटी रुपये आधीच मंजूर झाले होते. काही वृद्धांना हृदयविकाराचा त्रास होता. त्यानंतर ही घटना घडली. नांदेडमधील घटनेचा आढावा घेण्यात येणार असून त्यासाठी राज्याचे दोन मंत्री त्या ठिकाणी पोहचले आहेत. त्या ठिकाणी मृत्यू कसे झालेत याची माहिती ते घेणार असून योग्य त्या सूचना करणार असल्याची माहिती आहे.

### निवडक

#### भारतासह नेपाळमध्ये बसले भूकंपाचे हादरे

**नवी दिल्ली :** भारत आणि नेपाळमध्ये मंगळवारी (दि. ३) दुपारच्या सुमारास भूकंपाचे हादरे जाणवले. राजधानी नवी दिल्लीसह या भूकंपाचे धक्के हरियाणा, उत्तराखंड, पश्चिम उत्तर प्रदेश, पंजाब आणि राजस्थानमध्येही बसले. भूकंपामुळे लोकांनी घराबाहेर आणि कार्यालयाबाहेर धाव घेतली. या भूकंपाचे केंद्र नेपाळमध्ये असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.






**सातारा :** रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर सातारा येथे छत्रपती शिवाजी महाविद्यालय विकास समितीच्या बैठकीसाठी मंगळवारी आले होते. बैठकीनंतर त्यांनी माजी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या वेळी संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, सचिव विकास देशमुख, इतर पदाधिकारी, प्राचार्य, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य व कर्मचारी उपस्थित होते. (अधिक छायाचित्रे पान ६ वर..)

## मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते पनवेल विकास विशेष अंकाचे प्रकाशन




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिंदी विवेक मासिकाच्या पनवेल विकास विशेष या अंकाचे प्रकाशन राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते सोमवारी (दि. २) येथे करण्यात आले. पनवेल मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात हा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला होता.

या सोहळ्यास प्रमुख मान्यवर म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, आमदार निरंजन डावखरे, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, उत्तर रायगड भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, 'हिंदी विवेक'चे सीईओ अमोल पेडणेकर, प्रशांत मानकुमरे, ज्येष्ठ साहित्यिक अरविंद शर्मा 'राही' उपस्थित होते. त्याचप्रमाणे भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, दीपक बेहेरे, अॅड. प्रकाश बिनेदार, चारुशिला घरत, पनवेल तालुका मंडल अध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष अनिल भगत आदी उपस्थित होते.

या वेळी मंत्री रवींद्र चव्हाण यांनी आपल्या भाषणात राष्ट्रीय जाणिवेसाठी सजग राहण्याचे आवाहन करीत मासिकाच्या योगदानाचे कौतुक केले. राष्ट्र, संस्कृती आणि समाजहिताशी निगडित विषय आणि चर्चा घडवणे ही हिंदी विवेकची मुख्य भूमिका आहे. त्यामुळे ते वैचारिक मासिक म्हणून देश-विदेशात लोकप्रिय होत आहे. २०२४च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी देशात संभ्रम निर्माण करण्याचे काम देशद्रोही आणि समाजकंटक करीत आहेत. त्यांच्या चुकीच्या माहितीच्या युद्धाला तोंड देण्यासाठी आणि त्यांचे कारस्थान समजून घेण्यासाठी प्रत्येक घरात हिंदी विवेक मासिक असणे आवश्यक आहे.

आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, मोदी सरकार देशाला विकसित राष्ट्र बनवण्यासाठी ट्वीन सिटी, स्मार्ट सिटी, मेट्रो सिटी, ग्लोबल सिटी या स्वरूपात शहरांचा विकास करण्याचा संकल्प करीत आहे तसेच अशा विकसनशील शहरांची माहिती देणारे पनवेल विकास विशेष हे हिंदी विवेक मासिकाने प्रकाशित केले आहे ते अतिशय कौतुकास्पद आणि मार्गदर्शक आहे. त्यांनी पुढे म्हटले की, मोदी सरकारच्या माध्यमातून देशभरात सुरू असलेल्या विकासकामांची योग्य माहिती मिळवण्यासाठी हिंदी विवेक मासिक वाचले पाहिजे. **(पान २ वर..)**



# पनवेल परिसरात चोऱ्या वाढल्या

## दुकानातून रोख रक्कम चोरली



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील टपाल नाका येथील एका दुकानाच्या खिडकीचे गज कापून अज्ञात चोरट्याने रोख रक्कम लंपास केल्याची घटना घडली आहे.

पनवेलमधील सुवर्णशील अपार्टमेंटमध्ये प्रेम ट्रेडिंग कंपनीचे दुकान असून सदर दुकानाच्या खिडकीचे गज कापून अज्ञात चोरट्याने सुमारे ३५ हजार रुपयांची रोख रक्कम लंपास केली आहे. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. त्यापरिसरात असलेल्या सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून पोलिसांचे पथक अज्ञात आरोपीचा शोध घेत आहेत.

## वस्तूंनी भरलेली बॅग पळवली

**पनवेल : वार्ताहर**

रोख रकमेसह इतर महत्वाच्या वस्तूंनी भरलेली बॅग अज्ञात चोरट्याने पनवेल एसटी स्टॅन्ड फलाट क्रमांक ५ येथून पळवल्याची घटना आहे.

मुबशीरा माशम बर्डे यांनी त्यांच्याकडे असलेल्या बॅगेमध्ये रोख रकमेसह ॲपल कंपनीचे घड्याळ, पॉवर बँक, चार्जर व इतर महत्त्वाच्या वस्तू असा मिळून ६० हजार ५०० रुपये किमतीचा ऐवज होता.

ही बॅग पनवेल एसटी स्टॅन्ड फलाट क्र ५ येथून कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

दरम्यान, पनवेल परिसरात चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. नागरिकही त्यामुळे भयभीत झाले आहेत. त्यामुळे अशा चोरांचा शोध घेणे पोलिसांपुढे आव्हान आहे.

## ठोंबरेवाडीत घरफोडी; रोख रकमेसह कागदपत्रे लंपास

**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील ठोंबरे वाडीत एका राहत्या घरामध्ये एका अज्ञात चोरट्याने घडफोडी करून रोख रकमेसह कागदपत्रे लंपास केल्याची घटना घडली आहे.

या वेळी अज्ञात चोरट्यांनी घराच्या पाठीमागील खिडकीची लोखंडी ग्रील कापून प्रवेश केला. चोरी करण्याआधी चोरट्यांनी बॅटरीच्या सहाय्याने आतील रूमची पाहणी करून सीसीटीव्ही कॅमेरा कपड्याने पद्धतशीर झाकून घेतला. त्यानंतर घरात प्रवेश करून रूममधील कपाटाची झाडाझडती घेतली.

या वेळी एका पॉकेटात दोन ते तीन हजार रुपये दोन एटीएम कार्ड कंपनीचे ओळखपत्र चार चाकीचा परवाना गाडीचे आरसी बुक घेऊन चोरटे पसार झाले आहेत. या चोरीच्या घटनेची पनवेल तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.



## उरण नगर परिषदतर्फे साखरचौथ गणेशोत्सव



**उरण : वार्ताहर**

सालाबादप्रमाणे यंदाही उरण नगर परिषदेच्या वतीने साखर चौथ गणपतीमूर्तीचे पूजन केले गेले. या निमित्ताने श्री सत्य नारायणाची महापूजा ठेवण्यात आली होती.

उरण नगर परिषदेचे मुख्याधिकारी राहुल इंगळे व पत्नी अपूर्वा राहुल इंगळे पूजे ला बसले होते. सर्वांना महाप्रसाद आयोजन करण्यात आले होते.

या वेळी शहर अभियंता झुंबर माने, सुरेश पोसतांडेल, आरोग्य निरीक्षक हरेश तेजी आदींसह कर्मचारी उपस्थित होते. ज्यांनी या कार्यक्रमात सहकार्य केले होते त्यांना शाल पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

## सीकेटी महाविद्यालयात गांधी, शास्त्री जयंती साजरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादुर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी महात्मा गांधींच्या प्रतिमेचे पूजन केले व वाणिज्यविद्याशाखेचे शाखाधिपती प्रो. डॉ. एस. बी. यादव यांनी लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन केले. या वेळी महाविद्यालयाच्या सर्व विभागाचे प्रमुख, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## बीसीटी विधी महाविद्यालयाचे श्रमदान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालय पनवेल आणि पनवेल महापालिका यांच्या संयुक्त विद्यमानाने स्वच्छांजली कार्यक्रमांतर्गत विधी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी व राष्ट्रीय सेवा योजनेचे महिला प्रतिनिधी सहाय्यक प्राध्यापक डॉ. क्रांती भोवते यांनी सहभाग घेऊन श्रमदान केले.

या उपक्रमास प्रभारी प्रभारी प्राचार्य सानवी देशमुख यांचे



मार्गदर्शन लाभले. हा उपक्रम खानदेशवर शिवमंदिर खांदा कॉलनी येथे सकाळी १० ते ११ यादरम्यान राबविण्यात आला. महात्मा गांधी जयंतीनिमित्त सर्वांनी स्वच्छांजली अर्पण करून स्वच्छतेचे महत्त्व स्थापन केले.

## लिमये वाचनालयात गांधी, शास्त्री यांना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त पनवेल मधील के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालयात त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

या वेळी संस्थेच्या अध्यक्षा ॲड. सुनिता जोशी यांच्या हस्ते महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. व वाचक सभासद यांच्या हस्ते लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. संस्थेच्या अध्यक्षा ॲड. सुनिता जोशी यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या कार्याविषयी सविस्तर माहिती दिली. संस्थेचे कार्यवाह काशिनाथ जाधव यांनीही माहिती दिली. चनय्या विरुपक्ष मठपती यांनीही विचार मांडले.



या वेळी उपाध्यक्ष श्याम वालावलकर, सह.कार्यवाह जयश्री शेट्ये, कार्यकारी सदस्य हिमालिनी कुलकर्णी, सुनील खेडेकर, रमेश चव्हाण, लिपिक संपदा जोशी, सेवक संजय दिवटे व वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विनायक वत्सराज यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## ई-कचरा संकलन मोहिमेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### रामशेठ ठाकूर विद्यालयात उपक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात ई-कचरा संकलन मोहिम राबविण्यात आली होती. ही मोहिम २५ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत राबण्यिात आली होती. या मोहिमेमध्ये सर्व ई-कचरा रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात आणून जमा करण्यास विद्यार्थी आणि पालकांना आव्हान करण्यात आले होते. रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय आणि अंकुर सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने या मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

दरवर्षी जगभरात सुमारे ७० दशलक्ष टन ई-कचरा तयार केला जातो जर त्याची योग्य प्रकारे विल्हेवाट नाही लावली गेली तर किंवा त्याचा पुर्नवापर करण्यासाठी त्याचवर जर योग्य प्रक्रिया नाही केली गेली तर भविष्यात तो एक मोठा धोका बनू शकतो. बेरेलियम, कॅडमियम, पारा आणि शिसे या सारख्या




बऱ्याच हानिकारक सामग्रीची निर्मिती करतात हि सामग्री स्वत: विघटीत होत नाही, परंतू ती आपल्या पर्यावरणासाठी एक मोठा धोका म्हणून उद्‌भवते म्हणूनच त्याचे योग्य आणि कार्यक्षमतेने पुर्नवापर करणे फार महत्त्वाचे आहे.

विद्यार्थ्यांना या संदर्भात साक्षर करण्यासाठी या मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्या निशा नायर यांचे पूर्ण मोहिमेस मार्गदर्शन लाभले.

## पनवेलमध्ये शहरस्तरीय माती संकलन; 'माझी माती, माझा देश' उत्साहात

### अमृत कलश यात्रेला प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या वतीने आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र शासनाच्या 'माझी माती माझा देश' अभियानांर्गत अमृत कलश यात्रेतील शहरस्तरीय माती संकलन कार्यक्रम दिनांक १ ऑक्टोबर रोजी आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत नाट्यगृहात करण्यात आला. या वेळी चारही प्रभागातून विविध अमृत कलश यात्रांमधून गोळा करण्यात आलेली माती आयुक्त गणेश देशमुख व जवानांच्या हस्ते मोठ्या कलशात एकत्रित करण्यात आली.

या वेळी उपस्थित सर्वांनी 'जय जवान जय किसान, भारत माता की जयच्या घोषणा दिल्या. ही माती संकलन केलेला विशेष कलश पुढे दिल्लीला पाठविण्यात येणार आहे. या वेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर, अतिरीक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त गणेश शेटे, उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त अभिषेक पराडकर, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, शहर अभियंता संजय जगताप, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे, कार्यकारी अभियंता संजय जगताप, अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने




उपस्थित होते. तसेच केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाचे अधिकारी श्री. सत्यनारायण व जवान मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापालिका कार्यक्षेत्रात पनवेल महापालिकेच्या वतीने आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र शासनाच्या माझी माती माझा देश अभियानांर्गत चारही प्रभागात प्रभाग स्तरीय अमृत कलश यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये खारघरमध्ये, कामोठे, कळंबोली, पनवेल येथील अमृत कलश यात्रेमध्ये सुमारे ४००० हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी घरोघरी माती व तांदळाचे दाणे गोळा करून नागरिकांना या उपक्रमात सहभागी करून घेतले होते. या वेळी भजनी मंडळ आणि ढोल ताशा अशा पारंपरिक वाद्यांच्या



गजरात मोठ्या दिमाखात, उत्साहात यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव कार्यक्रमाच्या समारोपानिमित्ताने संपूर्ण राज्यात व देशात 'मेरी मिट्टी मेरा देश अर्थात' माझी माती माझा देश' अभियान राबविले जात आहे. या अंतर्गत पनवेल महापालिकेच्या वतीने पंच प्रण प्रतिज्ञा, वसुधा वंदन, वीरों का वंदन यांसारखे उपक्रम घेण्यात आले.

### चारही प्रभागांमधून उत्स्फूर्त प्रतिसाद

अमृत कलश यात्रेमध्ये चारही प्रभाग कार्यालयाचे अधिकारी, कर्मचारी, चारही प्रभागातले इंजिनिअरींग महाविद्यालये, कनिष्ठ महाविद्यालयाचे एनएसएसचे विद्यार्थी, प्राध्यापक तसेच माजी नगरसेवक, नागरिकांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन सहभागी झाले होते.

या अभियानांर्गत शेवटचा उपक्रम म्हणजे अमृत कलश यात्रा. दिल्लीमध्ये हुतात्मा स्मारकाजवळ देशाच्या वीरांच्या स्मरणार्थ उभारलेल्या अमृत वाटिकेत या कलशांमधील माती आणि तांदूळ पेरून या ठिकाणी 'अमृत वाटिका' तयार करण्यात येणार आहे. यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून ७५०० कलशांमध्ये माती घेऊन 'अमृत कलश यात्रा' काढण्यात येत असून ही 'अमृत वाटिका' 'एक भारत श्रेष्ठ भारत' या वचनबद्धतेचे प्रतीक असणार आहे.

पनवेल महापालिकेने अमृत कलश यात्रेच्या माध्यमातून महापालिका कार्यक्षेत्रातून माती संकलन केलेला विशेष कलश महापालिकेच्या स्वयंसेविकांद्वारा दिल्लीला पाठविण्यात येणार असल्याची माहिती उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी दिली.







**पनवेल : नैवेद्य सोसायटीत विराजमान गौरा गणपतीचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दर्शन घेतले. दरम्यान, सोसायटीच्या अध्यक्षपदी स्वप्नील ठाकूर यांची निवड झाल्याने त्यांचे अभिनंदन केले. या वेळी अमोल देशमुख, अजिंक्य कांडपिळे, योगेश कुलकर्णी, चारुदत्त पाध्ये, शैलेश गुरव आदी सभासद उपस्थित होते.**



**पनवेल : श्री गणेश मंडळ, कोपर यांच्या गौरा गणेशोत्सवाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट दिली. या वेळी भाजप उलवे नोड २चे उपाध्यक्ष अनंताशेठ ठाकूर, गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, भाजप ज्येष्ठ कार्यकर्ते वसंतशेठ पाटील, भाजप कोपर अध्यक्ष सुधीर ठाकूर, रणधीर ठाकूर, मधुकर पाटील, प्रदीप पाटील आदी उपस्थित होते.**





**पनवेल : भाजप जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी यांच्या गौरा गणपतीचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी दर्शन घेतले. या वेळी प्रल्हाद केणी त्यांचा सन्मान केला. सोबत माजी नगरसेवक हरेश केणी.**



**उरण : जासई येथील राजाराम रामदास म्हात्रे यांच्या घरी विराजमान गौरा गणपतीचे भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री कामगार नेते सुरेश पाटील यांच्यासह उद्योगपती मारुती कंक, राजन घरत, डी. पी. सोनावणे, निशिकांत सुतार, मधू पाटील, जासई विद्यालयाचे प्राचार्य अरुण घाग, रयत सेवक संघाचे समन्वयक नुरा शेख, जासई गावचे भाजपचे अध्यक्ष सुनील घरत आदींनी दर्शन घेतले.**

## संपादकीय

# दुर्दैवाचा घाला

नांदेड येथील सरकारी रुग्णालयात सोमवारी २४ तासांत २४ रुग्णांचा मृत्यू झाल्याची बातमी निश्चितच धक्कादायक आहे. अवघ्या दीड महिन्यांपूर्वी ठाण्यानजीकच्या छत्रपती शिवाजी सरकारी इस्पितळामध्ये एका रात्रीत १८ रुग्ण दगावले होते. महाराष्ट्राच्या आरोग्य व्यवस्थेवर पडणारे हे दुर्दैवाचे घाले तातडीने थांबायला हवेत यात शंकाच नाही. इस्पितळामधील हे मृत्यू नेमके कशामुळे झाले याची चौकशी अत्यंत तातडीने करून वेळीच उपाययोजना करणे ही काळाची गरज आहे. नांदेड येथे घडलेला प्रकार दुर्दैवी तर आहेच, परंतु त्याहीपेक्षा मोठे दुर्दैव याबाबत होणारे राजकारण आहे.

**काही घटना किंवा मुद्यांच्या बाबत राजकारण करू नये हे पथ्य सर्वच पक्षाच्या नेत्यांनी पाळायचे असते. नेता स्थानिक असो वा राष्ट्रीय पातळीवरचा, संवेदनशील गोष्टींबाबत त्याने संवेदना व्यक्त करणे समजू शकते, पण अशा गोष्टींचा राजकीय मुद्दा करून आपली पोळी भाजून घेण्याचा प्रकार संतापजनक वाटतो. नांदेडच्या शासकीय रुग्णालयामध्ये २४ तासात २४ रुग्ण दगावल्याची माहिती सोमवारी हाती आली. या २४ दुर्दैवी रुग्णांमध्ये १२ नवजात शिशुंचा समावेश आहे. त्यातील ११ नवजात बालके ही तीन दिवसाच्या आतील आहेत आणि जन्मत:च श्वसनसंस्था विकसित न झाल्याने त्यांचा मृत्यू झाल्याची नोंद करण्यात आली आहे. सध्या तेथील बालरोग विभागात १४२ बालकांवर उपचार सुरू आहेत. त्यातील ४२ बालके अतिदक्षता विभागात ठेवण्यात आली आहेत, अशी माहिती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. वाकोडे यांनी दिली आहे. अन्य मृत्युमुखी पडलेल्या रुग्णांमध्ये ४ हृदयविकाराने, १ विषबाधा, १ जठरव्याधी, २ किडनीव्याधी, १ प्रसूती गुंतागुंत, तर तिघांचा अपघात आणि इतर आजाराने मृत्यू झाला आहे. सरकारी रुग्णालयांमध्ये अनेकदा रुग्णांना कमालीच्या अत्यवस्थ स्थितीत आणले जाते. अन्यत्र उपाय करून झाल्यानंतर केस हाताबाहेर गेल्यावर सरकारी इस्पितळ गाठण्याकडे अनेकांचा कल असतो. यातून असे प्रकार संभवतात. परंतु औषधांचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे नांदेड येथील रुग्णालयातील मृत्यूचे तांडव पाहावे लागले अशी टीका विरोधकांनी सुरू केली आहे. वास्तविक औषधांचा तुटवडा हे कारण आता असू शकत नाही. कोरोनानंतर आपण सारे बरेच धडे शिकलो आहोत. औषधांचा तुटवडा पडल्यास सरकारी रुग्णालयात देखील बाजारातून औषधे विकत घेण्याचा मार्ग अवलंबला जातो. विरोधकांच्या आरोपात तथ्य नाही हे तर उघडच आहे. कारण औषधांचा तुटवडा नव्हता असे या रुग्णालयाच्या अधिष्ठात्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. सरकारी रुग्णालयामध्ये मृत्यूचे प्रमाण अचानक वाढीस का लागले या प्रश्नाचे उत्तर शोधताना अन्य बाबी तपासून पहाव्या लागतील. आरोग्य व्यवस्थेकडे अजुनही योग्य पद्धतीने लक्ष दिले जात नाही याची कारणे प्राय: स्थानिक पातळीवरच शोधावी लागतात. ठाण्यातील रुग्णालयामध्ये १८ जण दगावल्याच्या घटनेनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्वच सरकारी रुग्णालयांमधील व्यवस्थांचा आढावा घेण्याचे आदेश दिले होते. सरकारी आरोग्य व्यवस्थेत आमूलाग्र बदल करण्याची गरज आहे हे तर सारेच जाणतात. कोरोना काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आरोग्यविषयक सुधारणांना गती देण्याचा प्रयत्न केला. गरज आहे ती असे प्रकार रोखण्यासाठी सर्वांनीच प्रामाणिक प्रयत्न करण्याची, परंतु दुर्दैवाने अशा प्रयत्नांना राजकीय डावपेचांमुळे खीळ बसते. ठाणे किंवा नांदेड या दोन्ही ठिकाणी झालेल्या घटना दुर्दैवी निश्चितच आहेत, पण राजकारण हा त्यावरचा उपाय नव्हे.**

# पाठीवरची थाप कार्यासाठी उत्साहवर्धक ठरते!



एखादे चांगले काम केल्यावर पाठीवर थाप मिळाली की चांगले वाटते. नवीन काम करायला उत्साह येतो. मग ते सामाजिक कार्य असो किंवा राजकीय. असाच काहीसा अनुभव करंजाडेतील सरपंच आणि त्यांच्या सहकाऱ्यांना आला आहे. तेथील नागरिकांना पाणी दिल्यामुळे नागरिकांनी त्यांची वाजत गाजत मिरवणूक काढून सत्कार केला असा प्रसंग फार विरळाच असतो.

माणसाच्या मुलभूत गरजा म्हणजे अन्न, वस्त्र आणि निवारा. आपण निवारा शोधताना त्याठिकाणी दळण वळणाची साधने, पाणी आहे का? हे पहीले पहातो. मुंबईवरील ताण कमी करण्यासाठी नवी मुंबई वसवण्यासाठी सिडकोची स्थापना केली. त्यानंतर पनवेल व आजूबाजूला शहर वसवण्याचे काम ही सिडकोला देण्यात आले. तत्कालीन अधिकाऱ्यांनी शहरे वसवली पण तेथिल मुलभूत सोयींकडे मात्र फारसे लक्ष दिलेले दिसत नाही. त्यामुळेच त्याठिकाणी पाणी, रस्ते आणि गटाराच्या समस्या मोठ्या प्रमाणात दिसत आहेत. त्या सोडवतांना लोकप्रतिनीधिंची दमछाक होत आहे.

पनवेल महापालिका हद्दीला लागून असलेले करंजाडे शहर याचे उत्तम उदाहरण आहे. नवी मुंबई विमानतळ, भविष्यातील रेल्वेचे महत्त्वाचे टर्मिनल व पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व कोकणचे प्रवेशव्दार असलेल्या पनवेलला लागून असल्याने अनेकांनी येथे घरे घेतली. करंजाडे या वसाहतीला पाणी पुरवठा सिडकोकडून केला जातो. करंजाडे गावाला १७ एमएलडी पाणी लागते, पण प्रत्यक्षात तेवढे पाणी मिळत नाही. करंजाडे मधील सेक्टर ३, ४, ५ व ६मध्ये पाणी



### खबरबात
**नितीन देशमुख**

पुरवठा होत नाही. रात्रभर जागून ही पाणी मिळत नाही. सिडको प्रशासन मोठमोठ्या सोसायट्यांना दोन –तीन दिवसांनी एखादा टँकर पाणी पुरवते. तो पुरत नसल्याने टँकर विकत घ्यावा लागत आहे. करंजाडे एमबीआर (पाण्याची टाकी) भरण्यासाठी साधारणपणे १२ तास लागत होते. परिणामी रहिवाशांना दिवसातून एकदाच पाणीपुरवठा केला जातो. यावर उपाययोजना म्हणून एमजेपीच्या पाईपलाईनला बूस्टर पंप लावण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली होती.

करंजाडे पाणी प्रश्नावर सिडको व एमजेपीकडून रोज नवनवी कारणं देऊन वेळकाढूपणा करण्याचा प्रयत्न केला जात होता. एमजेपीकडून व्यवस्थित पाणीपुरवठा होत नाही त्यामुळेच आम्ही योग्य प्रकारे पाणीपुरवठा करू शकत नाही असे सिडको सांगते, तर एमजेपीचे म्हणणे की आम्ही सरासरी १६ एमएलडी इतका पाणीपुरवठा करतो, पण पाणी मिळत नसल्याने नागरिक मात्र हैराण झाले. सरपंच मंगेशजी शेलार, भाजप विभागीय अध्यक्ष कर्णाजी शेलार, उपसरपंच सागर आंग्रे, शहर अध्यक्ष मिरेंद्र शहारे, नंदकुमार भोईर, इतर ग्रामपंचायत सदस्यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. नवीन कनेक्शनची मागणी केली आणि वारंवार त्याचा पाठपुरावा देखील केला. सिडकोकडून यावर अनेकदा नकार दिला जात होता,

गावाकरिता दोन कनेक्शन घेण्यात आले त्यातील एक कनेक्शन तात्पुरत्या स्वरूपात सेक्टर–६ करिता देण्यात यावे, अशी आग्रही भूमिका घेण्यात आली. आमदार महेश बालदी व सरपंच यांच्या विशेष प्रयत्नाने मागणी मंजूर होऊन काम पूर्ण झाले. सगळ्यांना पुरेसे पाणी मिळू लागल्याने राम फाटे यांनी पुढाकार घेऊन सेक्टर ६ मधील सोसायटीतील नागरिकांना एकत्र करून सरपंच व त्यांच्या सहकाऱ्यांची सेक्टर ५ व ६ मधून वाजतगाजत मिरवणूक काढून सत्कार केला. ही खऱ्या अर्थाने त्यांच्या कामाची पोच दिली असेच म्हणावे लागेल. त्यामुळे आता जबाबदारी वाढली आहे. रस्त्यांची दुर्दशा झाली आहे. सेक्टर ५मध्ये तर बिकट अवस्था आहे. त्याचे टेंडर निघाले असले तरी ठेकेदाराच्या कामाकडे लक्ष ठेवले पाहिजे, जेणेकरून हे कामदेखील व्यवस्थित होईल. याशिवाय गटारे व्यवस्थित बांधून घेणे गरजेचे आहे. उद्यान, मैदानांचे प्रश्नही सोडवावे लागतील; अन्यथा विरोधक पुन्हा याचे राजकारण करण्यास तयारच आहेत.

**आम्ही ग्रामपंचायत निवडणुकीत जिंकून आल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून कामाला सुरूवात केली एक एक कामाचा पाठपुरावा सुरू केला आणि त्याचे रिजल्ट आता दिसायला सुरुवात झाली. आज केलेल्या सत्कारामुळे नवीन ऊर्जा मिळाली जो विश्वास लोकांनी आमच्यावर ठेवला त्यास कधीही तडा जाऊ देणार नाही. दिलेली सर्व वचने आम्ही पुर्ण करू**
**–मंगेश शेलार, सरपंच, करंजाडे**

**आमच्या सोसायटीत पाणी नसल्याने खूप हाल होत होते. टँकर घ्यावा लागत होता. त्यामुळे मेन्टनस जास्त द्यावा लागत होता. कोणी पाहुणे आल्यास लाज वाटायची आज नवीन कनेक्शन मुळे २४ तास पाण्याचे स्वप्न पूर्ण झाले. त्यामुळे सरपंच मंगेश शेलार व भारतीय जनता पक्षाचे करंजाडे शहर अध्यक्ष मिरेंद्र शहारे यांचे आभार मानतो.**
**–छाया तोंडलेकर,**
**भक्ती हेरिटेज सोसायटी**

**पाण्याच्या त्रासामुळे करांजाडेतील जागा सोडून जावे असे वाटत होते, पण सरपंच आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सिडको व एम जेपी कडे पाठपुरावा करून सेक्टर ६ साठी नवीन लाईन वरून जोडणी घेतल्याने आता पुरेसे पाणी येऊ लागले. त्यांनी घेतलेल्या मेहनती बद्दल आम्ही त्यांचा सत्कार करण्याचा निर्णय घेतला. त्याला सगळ्या सोसायटीतील रहिवाश्यांनी प्रतिसाद दिला. यापुढे ही ते आमच्या समस्या सोडवतील अशी आम्हाला खात्री वाटते.**
**–राम फाटे, रहिवासी**



## बदलते तंत्रज्ञान

### ॲपलचे 'हे' मोबाईल मिळतात खूप स्वस्तात; वाचा सविस्तर



ॲपलने आपली iPhone १५ मालिका १२ सप्टेंबर रोजी लॉन्च केली, ज्यासाठी दीर्घ प्रतीक्षा कालावधी आहे. अशा परिस्थितीत ॲपलच्या आयफोन सीरिजच्या जुन्या मॉडेल्सवर तुम्हाला मोठी सूट मिळू शकते.

तुम्ही ॲपल iPhone १४ चा १२८GB व्हेरिएंट फक्त ६९,९०० रुपयांना खरेदी करू शकता, या फोनची मूळ किंमत ७९,९०० रुपये आहे, ज्यावर तुम्हाला १०,००० रुपयांची सूट मिळत आहे.

ॲपल iPhone १४ च्या २५६GB वेरिएंटवर १०,००० रुपयांची सूट देखील आहे. या iPhone ची किंमत ७९,९०० रुपये आहे, जी तुम्ही ॲपल स्टोअर किंवा ई–कॉमर्स साइटवरून फक्त ६९,९०० रुपयांमध्ये खरेदी करू शकता.


ॲपल iPhone १४ Plus ७९,९०० रुपयांना खरेदी करता येईल, ॲपल iPhone १४ Plus ची मूळ किंमत ८९,९०० रुपये आहे. यावर ॲपलकडून १०,००० रुपयांची सूट दिली जात आहे.

ॲपल iPhone १४ Plus च्या २५६GB व्हेरिएंटवर तुम्हाला १०,००० रुपयांची सूट देखील मिळेल. -pple iPhone १४ Plus च्या २५६GB व्हेरिएंटची मूळ किंमत ९९,९०० रुपये आहे, जी तुम्ही फक्त ८९,९०० रुपयांना खरेदी करू शकता.

ॲपल iPhone १३ च्या १२८GB स्टोरेज वेरिएंटवर २०,००० रुपयांची सूट आहे, तुम्ही फक्त ५९,९९० रुपयांमध्ये खरेदी करू शकता. यासाठी तुम्ही ॲपल स्टोअर किंवा ई–कॉमर्स साइटवरून ऑर्डर करू शकता.

ॲपल iPhone १२ चे ६४ स्टोरेज व्हेरिएंट ४८,९९० रुपयांना खरेदी केले जाऊ शकते, त्याची मूळ किंमत ६५,९०० रुपये आहे. ॲपल iPhone १२ च्या या प्रकारावर ॲपल १६,९१० रुपयांची सूट देत आहे.

# दिमाखदार अभिनेता अरुण सरनाईक



### निमित्त

अरुण शंकरराव सरनाईक हे मराठी चित्रपट–अभिनेते होते. त्यांचा जन्म ४ ऑक्टोबर १९३५ रोजी झाला. अरुण यांच्या घरातच कला होती. त्यांचे वडील शंकरराव सरनाईक हे संगीतज्ज्ञ होते. तर त्यांचे काका निवृत्तीबुवा सरनाईक हे प्रख्यात शास्त्रीय गायक होते. गाण्याचे हे अंग त्यांना या जोडीकडूनच मिळाले. त्यामुळे अभिनयात नावारूपास येण्यापूर्वीच त्यांनी पेटी, तबल्यात मातब्बरी मिळवली होती. संगीताची हीच आवड त्यांना कलाक्षेत्रातील दारे उघडण्यास उपयोगी ठरली.

तत्पूर्वी मुंबईच्या रुईया महाविद्यालयामधून त्यांनी पदवीही मिळवली. त्यानंतर लेखक–दिग्दर्शक अनंत माने यांनी 'शाहीर परशुराम' चित्रपटात अरुण यांना एक दुय्यम भूमिका दिली. या भूमिकेपाठोपाठ लेखक–दिग्दर्शक दिनकर द. पाटील यांचा वरदक्षिणा आणि दत्ता धर्माधिकारी यांचा 'विठू माझा लेकुरवाळा' हा चित्रपटही अरुण यांना मिळाला. त्यानंतर आलेल्या 'रंगल्या रात्री अशा' या चित्रपटाने किमया केली आणि अरुण यांचा अरुणोदय झाला. त्यांनी भूमिका साकारलेले 'रंगल्या रात्री अशा', 'एक गाव बारा भानगडी', 'मुंबईचा जावई', 'केला इशारा जाता जाता', 'सवाल माझा ऐका' , 'सिंहासन' इत्यादी चित्रपट विशेष गाजले. १ सप्टेंबर १९६४ रोजी 'अपराध मीच केला' हे नाटक रंगमंचावर आले होते.


या नाटकातील कमांडर अशोक वर्टी ही व्यक्तिरेखा खूप गाजली होती. त्यावेळी ही भूमिका अरुण सरनाईक यांनी साकारली होती. त्यांच्यासोबत या नाटकात राजा नेने, शरद तळवलकर, वसंत ठेंगडी, कामिनी कदम हे कलाकारदेखील होते. राजा ठाकूर दिग्दर्शित 'पाहू रे किती वाट' या चित्रपटात ते डॉ. चारुदत्त या नायकाच्या व्यक्तिरेखेत झळकले तर 'सुभद्राहरण' या चित्रपटात त्यांनी थेट दुर्योधनाचा खलनायक साकारला. 'सवाल माझा ऐका'मधील त्यांचा ढोलकीवाला जयवंत आजही रसिकांच्या लक्षात आहे. असाच ढोलकीवाला त्यांनी 'केला इशारा जाता जाता' या चित्रपटातही साकारला होता.

लेखक अरुण साधू यांच्या 'सिंहासन' कादंबरीवर आधारित चित्रपटाची निर्मिती जब्बार पटेल यांनी केली. चित्रपटात सत्तेच्या राजकारणाचे अनेक पैलू बारकाव्याने टिपले आहेत. यात अरुण सरनाईक यांनी मुख्यमंत्र्यांची साकारलेली व्यक्तिरेखा ही त्यांच्या अभिनय कारकिर्दीतील सर्वोच्च ठरली! दिनकर पाटील यांचा 'वरदक्षिणा' (१९६२) सारखे सामाजिक, अनंत मानेंचा 'एक गाव बारा भानगडी' (१९६८), 'गणाने घुंगरू हरवले' (१९७०) सारखे ग्रामीण तर 'घरकुल' (१९७०) सारखे शहरी चित्रपटांतील त्यांच्या भूमिका वैशिष्ठ्यपूर्ण ठरल्या! गायक घराण्यातून आल्याने त्यांनी काही चित्रपटांतून गाणीही गायली. अभिनयातील व्यस्तता एकीकडे कायम ठेवत सरनाईकांनी आपण समाजाचे देणे लागतो, या भावनेला छेद दिला नाही. चित्रीकरणातून वेळ मिळाला की कुष्ठरुग्णांसाठी काम करणार्या 'आनंदग्राम'मध्ये ते स्वतःला झोकून द्यायचे. तिथे खर्या अर्थाने ते रमले. तिथल्या आबालवृद्धांच्या हाती फळे, खाऊ देताना त्यांच्या चेहर्यावरून आनंद ओसंडून वाहायचा. अशा या महान अभिनेत्याचे २१ जून १९८४ रोजी निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

### क्लिक...क्लिक...!






**पनवेल : रेल्वे प्रशासनाने शनिवार ते सोमवारपर्यंत घेतलेला मेगाब्लॉक उशिरा संपला, पण त्यानंतर मंगळवारीदेखील उर्वरित कामे पूर्ण करण्यात येत होती. त्यामुळे खांदेश्वर ते पनवेल रेल्वेस्थानकांदरम्यान अनेक लोकल गाड्या थांबल्या होत्या. अशा वेळी अनेक प्रवाशांनी गाडीतून उतरून पायीच इच्छितस्थळी जाणे पसंत केले.** (छाया : तन्वी पवार)

## आरोग्य प्रहर

### शरीरातील प्लेटलेट्स वाढवण्यासाठी उपाय




रक्ताची कमतरता असेल तर डाळिंब खाण्याचा सल्ला दिला जातो. औषधांव्यतिरिक्त रुग्णाला डाळिंब खायला द्यावे. डाळिंबामध्ये प्लेटलेट्सची संख्या वाढवणारे घटक असतात. डाळिंब आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. लोह भरपूर प्रमाणात असल्याने शरीरातील रक्ताचे प्रमाण वाढते. डाळिंबामध्ये आढळणारे आवश्यक मिनरल्स आणि इम्युनिटी बूस्टर न्यूट्रिएंट्स तुम्हाला ताकद देतात.

बदलत्या ऋतूत डेंग्यू आणि मलेरियाचा धोका असतो. डेंग्यूचा आजार झपाट्याने पसरतो. डेंग्यूमध्ये ताप, सर्दी, खोकला या सगळ्याचा प्रचंड त्रास होतो. डेंग्यू जेव्हा बरा होतो त्यानंतरसुद्धा शरीरात रक्ताची कमतरता असते. बरेचदा तर प्लेटलेट्सची संख्यासुद्धा कमी झालेली असते. हे सगळं भरून काढण्यासाठी, डेंग्यूमधून रिकव्हर होण्यासाठी डॉक्टरांकडून सल्ले दिले जातात.

डेंग्यू आजारात रुग्णांची रोगप्रतिकारशक्ती खूपच कमकुवत होते. यासोबतच डिहायड्रेशनसुद्धा होते. आज आपण असे पदार्थ बघणार आहोत जे खाल्ल्याने तुमचे प्लेटलेट्स वाढू शकतात. या पदार्थांचा तुम्ही रोज आहारात समावेश करू शकता.

व्हिटॅमिन सी खाल्ल्याने शरीरातील प्लेटलेट्सची संख्या वाढते संत्री, आवळा, लिंबू असे व्हिटॅमिन सी चे पदार्थ खाल्ल्याने खूप फायदा होतो, प्लेटलेट्स वाढवतात.

शरीरातील रक्त वाढविण्यासाठी रात्रभर मनुके पाण्यात भिजवून ठेवा आणि सकाळी उठून ते खा. निमियासारख्या आजारात मुनका खूप फायदेशीर आहे. हे खाल्ल्याने शरीरातील कमी झालेल्या प्लेटलेट्स झपाट्याने वाढतील. मनुक्यामध्ये लोहाचे प्रमाण चांगले आहे.

रक्ताची कमतरता असेल तर डाळिंब खाण्याचा सल्ला दिला जातो. औषधांव्यतिरिक्त रुग्णाला डाळिंब खायला द्यावे. डाळिंबामध्ये प्लेटलेट्सची संख्या वाढवणारे घटक असतात. डाळिंब आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. लोह भरपूर प्रमाणात असल्याने शरीरातील रक्ताचे प्रमाण वाढते. डाळिंबामध्ये आढळणारे आवश्यक मिनरल्स आणि इम्युनिटी बूस्टर न्यूट्रिएंट्स तुम्हाला ताकद देतात.

## निवडक



### रोहा पोलिसांकडून साफसफाई

**रोहे** : स्वच्छ भारत अभियानांतर्गत रोहा पोलीस ठाणे येथे पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी, अंमलदार, डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्या माध्यमातून स्वच्छता मोहीम पोलीस ठाणे आवारात राबविण्यात आली. या वेळी पोलीस ठाण्याचे दोन अधिकारी, १४ कर्मचारी व डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे आठ श्री सदस्य हजर होते.

### रातवड विद्यालयात स्वच्छता अभियान



**माणगाव** : महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त माध्यमिक विद्यामंदिर रातवडच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियान राबविले. मुख्याध्यापक महादेव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी या अभियानात सहभागी झाले होते. महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना महात्मा गांधी यांच्या विचारांबाबत शिक्षक अजित शेडगे यांनी मार्गदर्शन केले. ज्येष्ठ शिक्षक गजानन पाटील, शिक्षकेतर कर्मचारी व शालेय छात्र संसद यांच्या हस्ते म. गांधी व लालबहादूर शास्त्री यांना आदरांजली वाहण्यात आली.

### मोरे महाविद्यालयात एक तास श्रमदान



**रोहे** : मोरे महिला महाविद्यालयात स्वच्छ भारत मिशन आणि स्वच्छता ही सेवा या उपक्रमांतर्गत एक तास श्रमदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महिला महाविद्यालयातील एनएनएस विभाग आणि रोठ (बु) ग्रामपंचायतीने संयुक्तपणे श्रमदानाचे नियोजन केले. विद्यार्थिनींनी स्वच्छतेचा नारा देऊन गावातून रॅली काढली आणि ग्रामस्थांसह साफसफाई देखील केली. मेरी माटी, मेरा देश या उपक्रमानुसार ग्रामपंचायतीमध्ये अमृत कलशाची स्थापना केली. महाविद्यालयाच्या एनएनएस विभागप्रमुख प्रा– मयुर पाखर, सरपंच नितीन वारंगे, ग्रामपंचायत सदस्य आणि २१ विद्यार्थिनी उपस्थित होते.

### तरन्नुम काजमी यांना पुरस्कार

**पेण** : विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा स्टार इंडिया फॉरेव्हरतर्फे पुरस्कार देऊन सन्मान



करण्यात येतो. यावर्षी पेण येथील रेड रॉक्स जिमच्या संस्थापिका तरन्नुम काजमी यांनी महिलांच्या सर्वांगिण आरोग्यासाठी रायगड आणि नवी मुंबई विभागात केलेल्या कार्याची दखल घेऊन सर्वोत्कृष्ट व्यावसायिक महिला इन हेल्थ सेक्टर हा पुरस्कार सुप्रसिद्ध अभिनेत्री मलायका अरोरा यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले. या पुरस्काराबद्दल त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

### महात्मा गांधी जयंती साजरी



**चौक** : महात्मा गांधी यांची १५४वी जयंती खालापूर तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये साजरी करण्यात आली. ग्रामपंचायत कार्यालयात महात्मा गांधी यांच्या तसबिरीला पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी महात्मा गांधी यांच्या अहिंसा या वृत्तीने गावागावात कामकाज करण्याबाबत सर्व सदस्यांनी एकमत केले.

### श्री अष्टविनायक पतसंस्थेची सभा

**नागोठणे** : येथील श्री अष्टविनायक ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची रौप्य महोत्सवी सर्वसाधारण सभा शनिवारी (दि.३०) आनंदी वातावरणात झाली. या वेळी अध्यक्ष विलास चौलकर, नागोठणे पोलीस प्रभारी अधिकारी संदिप पोमन, रजिपचे माजी सदस्य नरेंद्र जैन, राष्ट्रीय जनहित कामगार कर्मचारी महासंघाचे महाराष्ट्र उपाध्यक्ष किशोर म्हात्रे, भाजपच्या जिल्हा उपाध्यक्ष श्रेया कुंटे, राष्ट्रवादी शहराध्यक्ष सुजाता जावके, उपाध्यक्षा प्रतिभा तेराडे, नागोठणे माजी सरपंच निलोफर पानसरे, पतसंस्थेचे उपाध्यक्ष महादेवसिंग परदेशी, संस्थापक संचालक जयराम पवार, सल्लागार रजिपचे निवृत्त उपमुख्य कार्यकारी अधिकारी शरद वाडेकर, सचिव प्रफुल नागोठणेकर, खजिनदार रतन हेंडे, संचालक रोहिदास हातनोलकर, दिलीप धाडसे, रवींद्र वाजे, दिनेश घाग, दिलीप सोनावणे आदी उपस्थित होते. या वेळी गुणवंत विद्यार्थी व कर्तृत्वान व्यक्तींचा सत्कार करण्यात आला.



# भाजपमुळेच गीते खासदार झाले होते

## खासदार सुनील तटकरे यांची टीका

**मुरुड : प्रतिनिधी**

अनंत गीते हे खासदार म्हणून गेली अनेक वेळा निवडून आले ते एकट्या शिवसेनेच्या बळावर निवडून गेलेले नाहीत. ते ज्या ज्या वेळी निवडून आले, त्या वेळी भाजपचे सहकार्य लाभल्यानेच ते निवडून आले आहेत. २०१९मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोटो प्रत्येक बॅनरवर लावूनच निवडणूक लढले होतात हे विसरू नका, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार सुनील तटकरे यांनी केली.



मुरुड तालुक्यातील उसरोली गावात राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष फैरोज घलटे यांच्या निवासस्थानी कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी सचिव विजय पैर, शहराध्यक्ष संजय गुंजाळ, माजी सभापती स्मिता खेडेकर, माजी सभापती अशिका ठाकूर, माजी जि. प. सदस्य सुबोध महाडिक, विभागीय अध्यक्ष श्याम कोतवाल, योगेंद्र गोयजी, दिनेश बापलेकर, मंगेश शेट्टी, राज पाटील, आदेश भोईर, किरण नाईक, इस्माईल सिद्धीकी, हसमुख जैन, अरविंद भंडारी, महेश पाटील आदी उपस्थित होते.

खासदार तटकरे आपल्या भाषणात म्हणाले की, रायगड जिल्ह्यातील अल्पसंख्याक समाजाचा माझ्यावर विश्वास आहे. माझ्या कामाची हिच पोचपावती असून राज्य सरकारच्या माध्यमातून विकासकामांना गती देणार मिळणार आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने जबाबदारीने काम करून पक्ष संघटना बळकट करावी. उद्धव ठाकरे गटातील नेत्यांनी मला दुर्बुद्धीचे उदाहरण देऊ नये. भाजपची साथ होती म्हणून खासदार झालात याचा विसर का पडत आहे, याचे उत्तर जनतेला गीते यांनी द्यावे असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

तालुका अध्यक्ष फैरोज घलटे व सचिव विजय पैर यांनी विकासाला गती देणारे व सर्वांचे प्रश्न आत्मियतेने सोडवत असल्यानेच तटकरे यांच्या पाठीशी सर्व जाती धर्माचे लोक दिसून येत आहेत. मुरुड तालुका त्यांच्या पाठीशी खंबीर उभा राहणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. मुरुड शहर अध्यक्ष संजय गुंजाळ यांनी म्हसळा, श्रीवर्धन व माणगाव मेळाव्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून असंख्य अल्पसंख्यक लोक साहेबांच्या पाठीशी आल्याचे सांगितले.

# उसर प्रकल्पग्रस्त व गेल कंपनी यांची उद्या बैठक

**रेवदंडा : प्रतिनिधी**

संयुक्त प्रकल्पग्रस्त कामगार आंदोलन समिती व गेल इंडिया व्यवस्थापन यांच्यासह बैठक मंगळवारी (दि. ३) जिल्हाधिकारी रायगड यांनी आयोजित केली होती. त्यानुसार उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे यांचे उपस्थितीत झालेल्या बैठकीमध्ये गुरुवारी (दि. ५) गेल इंडिया व्यवस्थापनच्या दिल्ली येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत होणार असल्याचे आंदोलन समितीचे अध्यक्ष निलेश गायकर यांनी सांगितले.

उसर प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांची पूर्ततेचे आश्वासन कागदोपत्रीच ठेवत प्रकल्पग्रस्तांची दिशाभूल करणाऱ्या गेल इंडिया कंपनी प्रशासनाविरोधात प्रकल्पग्रस्त कामगार आंदोलन समितीने साखळी उपोषण सुरू केले आहे. या पार्श्वभूमिवर जिल्हाधिकारी यांनी संयुक्त प्रकल्पग्रस्त कामगार आंदोलन समिती व गेल इंडिया व्यवस्थापन यांचेशी मंगळवारी चर्चेचे आयोजन केले होते. त्यामुळे कामबंद आंदोलन स्थगित करण्यात आले होते.

उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे यांचे उपस्थितीत झालेल्या बैठकीमध्ये गुरुवारी (दि. ५) गेल इंडियाच्या दिल्ली येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत होणार असल्याचे सांगण्यात आले आहे.



# बँक व्यवस्थापकांमध्ये हाणामारी; डोक्यात काचेची बाटली मारली

**खोपोली : प्रतिनिधी**

बँकेमध्ये कर्ज काढण्यासाठी येणारे काही ग्राहक माझ्याकडे पाठवून दे असे सांगितल्याने झालेल्या वादातून एका बँक मॅनेजरने दुसऱ्याच्या डोक्यात काचेची बाटली मारल्याची घटना तालुक्यातील खोपोली येथे घडली.

परेश रोहिदास ठोंबरे (वय २६ रा. माणकिवली, खालापूर) हे रविवारी (दि. १) रात्री ८.३०वा. च्या सुमारास पाटणकर चौकाचे पुढे मोगलवाडीकडे जाणारे रस्त्यावर त्यांच्या मित्राला बँकेच्या कामानिमित्त भेटण्याकरीता उभे होते. त्या वेळी शिवचंद्र मिश्रा (रा. माळा, मोगलवाडी, खोपोली) हा त्या ठिकाणी आला.

मिश्रा याने परेश याला बँकेत कर्जाकरीता येणाऱ्या काही ग्राहकांना माझ्याकडे पाठवून दे असे सांगितले. त्यावर परेश याने मिश्रा याला तू जसा बँकेत मॅनेजर या पदावर आहेस तसाच मीसुद्धा बँकेत मॅनेजर म्हणून काम करतो, असे बोलताच मिश्रा शिविगाळ करू लागला.

त्यावर तू मला शिविगाळ का करतोस, असे परेश याने विचारले असता त्या गोष्टीचा मनात राग धरून मिश्रा याने त्याचे खिशातून काचेची बाटली काढून परेशच्या डोक्यात मारून दुखापत करून पळून गेला.

जखमी परेश याने याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे शिवचंद्र मिश्राविरुद्ध तक्रार दिली असून पोलिसांनी भादंविक. ३२३, ३२४, ५०४प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोसई. अभिजित व्हरांबळे हे करीत आहेत.

## भाजप अल्पसंख्याक मोर्चा जिल्हाध्यक्षपदी रईस कादरींची फेरनिवड

**रोहे : प्रतिनिधी**



रईस कादरी यांची दक्षिण रायगड भाजप अल्पसंख्याक मोर्चाच्या अध्यक्षपदी फेरनिवड झाली आहे. माजी आमदार भाजप दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष धैर्यशील पाटील यांनी २०२३ ते २०२६ या कालावधीसाठी दक्षिण रायगड भाजप कार्यकारिणी जाहीर केली आहे.


देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून प्रेरणा घेत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण व भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणार असल्याचे नवनिर्वाचित अल्पसंख्याक मोर्चा दक्षिण रायगड अध्यक्ष रईस कादरी यांनी सांगितले.

# रोह्यात मोकाट गुरे वाढली

## नागरिकांना त्रास; वाहतुकीस अडथळा

**रोहे : प्रतिनिधी**

शहरातील बाजारपेठेत मोकाट गुरे वाढली असून रस्त्यावरच बसत असल्याने नागरिकांसह व्यापारी वर्गाला त्याचा त्रास सहन करावा आहे. त्यामुळे वाहतुकीस अडथळा होताना दिसत आहे. त्याप्रमाणे अनेक दुकानांच्या समोर ही मोकाट गुरे बसून अस्वच्छता होत आहे. त्यामुळे बाजारपेठेत दुर्गंधी पसरली आहे. या मोकाट गुरांचा बंदोबस्त करण्याची मागणी नागरिक व व्यापाऱ्यांमधून होत आहे.



आधीच बाजारपेठेतील रस्ता अरुंद आहे. या रस्त्यावर गुरांचा कळपच बसलेला असतो. यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. किराणा, फळे व भाजीपाला दुकानासमोरील मिळालेले खाद्य ते खात असतात आणि त्याच ठिकाणी ठिय्या मांडून बसलेले असतात.

पूर्वी या गुरांचा बंदोबस्त करण्यासाठी शहरात कोंडवाडा होता, परंतु आता शहरात कोंडवाडाच राहिला नाही. त्यामुळे ही मोकाट गुरे सर्वत्र फिरताना दिसत आहेत.

रात्री काही गुरे अंधारात दिसत नसल्याने अपघात होतात. यात वाहनधारक जखमी होतोच, परंतु गुरेही जखमी होताना दिसत आहेत. यावर रोहा अष्टमी नगर परिषदेने उपाययोजना करून गुरांचा बंदोबस्त करण्याची मागणी व्यापारी वर्गातून होत आहे.

# रोह्यात ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा ज्येष्ठ नागरिक सभागृहात जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन जल्लोषात साजरा झाला. या दिनाचे औचित्य साधत तालुक्यातील वयाची ८० वर्षे पूर्ण झालेल्या ज्येष्ठ नागरिकांना गौरविण्यात आले.

या वेळी व्यासपीठावर संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुरेश पालकर, अध्यक्ष पांडुरंग सरफळे, शांताराम गायकवाड, सुरेश मोरे, डॉ. फरीद चिमावकर, अविनाश म्हात्रे, डॉ. वेदक, मेहेंदळे सर, शैलजा देसाई आदी उपस्थित होते.

या वेळी ज्येष्ठ नागरिकांसाठी शासनाने वेळोवेळी जे धोरण जाहीर केले त्याची अंमलबजावणी प्रशासनाकडून होत नसल्याबद्दल अध्यक्ष सरफळे यांनी खंत व्यक्त केली.

ज्येष्ठ नागरिकांना सुखी व सुरक्षित जीवन जगता यावे म्हणून केंद्रीय अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद नसावी ही बाब खेदजनक असल्याचे जिल्हाध्यक्ष सुरेश पालकर यांनी सांगितले.




**रोहा** : डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या सौजन्याने स्वच्छ भारत मिशन अंतर्गत रोहा बसस्थानकात स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत प्रतिष्ठानचे १५० श्री सदस्य व आगारातील पर्यवेक्षकीय, यांत्रिकी, चालक व वाहक तसेच शासकीय कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.









**पेण** : तालुक्यात ठिकठिकाणी मंगळवारी साखरचौथीच्या अर्थात गौरा गणपतीची प्रतिष्ठापना करण्यात आली. माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील यांनी या गणरायाचे दर्शन घेतले. सोबत पदाधिकारी, कार्यकर्ते, भाविक आदी.

# गांधी, शास्त्रींना जयंतीनिमित्त अभिवादन



## सीकेटी विद्यालय

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयाच्या इंग्रजी माध्यमात महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. पर्यवेक्षिका निरजा मॅडम यांनी या थोर नेत्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले. निधी पाटील, कैवल्य पाटील आणि साईराज पाटील या विद्यार्थ्यांनी या नेत्यांबद्दल अभ्यासपूर्ण माहिती आपल्या भाषणातून सांगितली.

स. शिक्षिका मनिषा पाटील यांनी मुलांना या थोर नेत्यांच्या चरित्रातून त्यांचे गुण आत्मसात करा, असे सांगितले. सांस्कृतिक विभाग प्रमुख सुप्रिया ताम्हनकर यांनी स्वच्छता पंधरवडयाने औचित्य साधून विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व विशद केले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहा पाटील यांनी केले.

मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांपुढे नेहमीच चांगला आदर्श ठेवणे हे आपले कर्तव्य आहे म्हणूनच अशा थोर नेत्यांचा स्मृतीदिन आम्ही साजरे करतो आणि या नेत्यांच्या चरित्रामधून मूल्यांची शिकवण विद्यार्थ्यांना देतो.

## फुंडे हायस्कूल

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर विद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त स्वच्छ भारत मिशन अंतर्गत १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर स्वच्छता पंधरवडा या अभियानांतर्गत स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

विद्यालयाचे प्राचार्य एम. जी. म्हात्रे, पर्यवेक्षक एस. जी. म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख व्ही. के. कुटे व सर्व सेवक वृंद यांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाची तयारी इयत्ता सातवी अ चा वर्गाने वर्गशिक्षिका एस.जे. माळी यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तम प्रकारे केली होती.

यानंतर लगेचच शालेय परिसर स्वच्छता अभियान राबविण्यात आला. सर्व शिक्षक व विद्यार्थी यांनी शालेय परिसराची स्वच्छता केली. ३ ऑक्टोबर रोजी विद्यालयात गांधी जयंतीनिमित्त वक्तृत्व निबंध व चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.



## उरण महाविद्यालय



**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य कला महाविद्यालयातील राष्ट्रीय योजना विभागाच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. बळीराम एन. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात के. ए. शामा यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. या वेळी ज्येष्ठ प्रा. व्हि. एस. इंदुलकर सर यांनी महात्मा गांधी यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. तर डॉ. एम.जी. लोणे यांनी गांधीजींच्या अहिंसा या तत्त्वाविषयी सविस्तर माहिती सांगितली.

कार्यक्रमाचे आभार आयक्युएसी समन्वयक डॉ.ए.आर.चव्हाण यांनी व्यक्त केले तर सूत्रसंचालन एनएसएस प्रमुख डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले. उपस्थित सर्वांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांना कृतज्ञता पूर्वक अभिवादन केले.

# नेव्हीमध्ये नोकरी देतो सांगून तरुणाची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

मर्चंट नेव्हीमध्ये नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून खारघरमधील एका तरुणाला सुमारे सव्वा दोन लाख रुपयांना गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पवन कामर असे फसवणूक करणाऱ्या भामट्याचे नाव असून खारघर पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे.

या प्रकरणात फसवणूक झालेल्या तरुणाचे नाव सचिन कुमार (वय २५) असे असून तो खारघर सेक्टर-१० मध्ये राहण्यास आहे. सचिनने मर्चंट नेव्हीचे प्रशिक्षण घेतले होते. त्यामुळे तो त्या क्षेत्रातील नोकरीच्या शोधात होता. मार्च महिन्यात सचिनला फेसबुकवर कोचीन येथील डॉल्फीन शिपिंग कंपनीमध्ये नोकरी उपलब्ध असल्याची जाहिरात निदर्शनास आल्याने त्याने या जाहिरातीवरील मोबाईल नंबरवर आपला बायोडेटा पाठवला होता. त्यानंतर पवन कुमार नामक भामट्याने सचिनला कोचीन येथे नोकरी असल्याचे सांगत तेथे त्याला ३७ हजार रुपये पगार मिळणार असून या नोकरीसाठी दोन लाख रुपये देण्याची मागणी केली. सचिनने नोकरीची तयारी दर्शवल्यानंतर पवनकुमार याने कागदपत्रे मागवून घेत सिक्युरिटी म्हणून १० हजार रुपये, अॅग्रीमेंट बनवण्यासाठी ३२ हजार ४०० रुपयांची मागणी केली. ही रक्कम पाठवल्यानंतर पवनकुमार याने अॅग्रीमेंट बनवून देत सचिनकडे उर्वरित पैशांची मागणी केली. त्यानुसार सचिनने एक लाख रुपये पाठवून दिल्यानंतर पवन कुमारने त्याला मुंबई ते कोचीन हे विमानाचे तिकीट पाठवून दिले.

सचिनने आणखी ५७ हजारांची रक्कम पाठवल्यानंतर १५ सप्टेंबर रोजी तो मुंबई विमानतळावरून विमानाने कोचीन येथे गेला. त्यानंतर पवनकुमार याने पीसीसी लागते, असे सांगून सचिनकडे आणखी २० हजार रुपयांची मागणी केली. ही रक्कमसुद्धा सचिनने पाठवून दिली, मात्र त्यानंतर पवनकुमार याने त्याचा फोन उचलणे बंद करून त्याच्याशी संपर्क तोडला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर सचिनने कोचीन येथून मुंबई गाठून अखेर खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.



पनवेल : गौरा गणेशोत्सवानिमित्त विराजमान भाजी मार्केटच्या राजाचे महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह भाजप जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस नितीन पाटील, शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे आदींनी दर्शन घेतले.

# पेट्रोल पंपावरील कामगारांना मारहाण करून रक्कम चोरली

**पनवेल : वार्ताहर**

पेट्रोल भरण्याच्या कारणावरून झालेल्या वादाचा मनामध्ये राग धरून दोघांना लाथाबुक्यांनी पाठीमध्ये व पोटामध्ये मारहाण केली आणि त्यांच्या खिशातून सात हजार रुपये जबरीने काढून घेतल्याप्रकरणी तिघांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

जगन्नाथ यादव हा झोजवाला हायवे सर्विस पेट्रोल पंप, काळूंद्रे येथे काम करतो. ३० सप्टेंबर रोजी रात्री एकच्या सुमारास दोन मुले एक्टिवा स्कुटीवरून पेट्रोल भरण्यासाठी आले व त्यांच्यासोबत आणखी एक मुलगा दुसऱ्या बाईकवर आला. जगन्नाथ यादव याला पेट्रोल भरण्यास सांगितले, या वेळी किती रुपयांचे पेट्रोल भरायचे आहे असे विचारले असता त्यांनी शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. शिविगाळ का करता असे विचारले असता दोन्ही मुलांनी खाली उतरून लाथा बुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी पेट्रोल पंपावर काम करणारा जितेंद्र यादव व इतर पेट्रोल पंपावरील काम करणारे यांनी सोडवण्याचा प्रयत्न केला असता त्यातील एकाने जितेंद्र यादव यालादेखील लाथाबुक्यानी मारहाण केली. या झालेल्या झटापटीमध्ये मारहाण करणाऱ्यांपैकी एकाने जगन्नाथ याच्या खिशातून पेट्रोलचे भरणा केलेली रक्कम सात हजार रुपये काढून घेतले व ते सर्वजण तेथून निघून गेले. या प्रकाराची माहिती पनवेल पोलिसांना देण्यात आली. जखमींना वैद्यकीय उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे दाखल करण्यात आले. या प्रकरणी तिघां विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# स्वच्छता उपक्रमात ग्राइंडवेल नॉर्टन कंपनीचा सहभाग

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील मोरा (उरण) येथील ग्राइंडवेल नॉर्टन लिमिटेड चे कारखाना प्रमुख कमलजीत सिंग व आय. बी. सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली मोरा समुद्र किनारी रविवारी (दि. १) स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेत स्टाफ, अॅडमीनचे गणपत दाटेकर व कर्मचारी, कामगार, कंत्राटी कामगार सुमारे ८० कामगार सहभागी झाले होते. या वेळी सुमारे एकूण ३ टन कचरा गोळा करण्यात आला. सकाळी १२ ते दुपारी १ वाजेपर्यंत एक तास स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.



मोरा समुद्रकिनारी असलेल्या प्लास्टिक पिशव्या, पाण्याच्या प्लास्टिकच्या रिकाम्या बाटल्या, झाडांच्या झावल्या, कचरा, फांद्या आदी गोळा करण्यात आल्या.

# भाजपतर्फे नेरूळमध्ये स्वच्छता मोहीम

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शिरवणे विद्यालय आणि ज्युनिअर कॉलेज, नेरूळ सेक्टर २, नवरात्र उत्सव चौक, सेक्टर २३ जुईनगर आणि लोकनेते दि बा पाटील क्रिडा संकुल, जुईनगर विभागातील नागरिकांनी प्रतिसाद देत एक तारीख, एक दिवस स्वच्छतेसाठी या अभियानात सहभाग घेतला.



या अभियान अंतर्गत नवी मुंबई महापालिकेच्या माध्यमातून सर्व परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या वेळी भाजप नवी मुंबई उपाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, माजी नगरसेवक काशिनाथ पाटील यांसह भाजप कार्यकर्ते, विभागातील नागरिकांनी या स्वच्छता मोहिमेत सहभाग घेत परिसर स्वच्छ केला व स्वच्छतेविषयी जनजागृती केली.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचा 'भजन संध्ये'त सहभाग

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनी महाराष्ट्र शासनाने व केंद्र शासनाने महात्मा गांधी जयंतीनिमित्त फोर्ट मुंबई येथे आयोजित केलेल्या भजन संध्या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

या कार्यक्रमासाठी मुंबई व नवी मुंबईमधील सर्व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी महात्मा गांधीजींच्या जयंती निमित्त वेगवेगळे देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण केले.

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश महाविद्यालयीन तरुण-तरुणीमध्ये स्वच्छते विषयी तसेच महात्मा गांधीजींच्या तीन तत्वे सत्य अहिंसा व प्रेम ही रुजावीत व त्याविषयी जागरूकता निर्माण व्हावी हा होता. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रूपेंद्र गायकवाड यांनी राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनीना प्रोत्साहन व शुभेच्छा दिल्या.



या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक प्रा. प्रथमेश ठाकूर तसेच प्रा. राहुल कांबळे प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. राजश्री म्हात्रे, प्रा. प्रतीक्षा पाटील, प्रा. करिष्मा खडक व प्रा. कावेरी घोगरे यांनी सहकार्य केले.

दरम्यान, रामशेठ ठाकूर महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतात.



**सातारा : रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर सातारा येथे छत्रपती शिवाजी महाविद्यालय विकास समितीच्या बैठकीसाठी मंगळवारी आले होते. या वेळी त्यांनी स्वखर्चाने उभारलेल्या लोकनेते रामशेठ ठाकूर भवनाची पाहणी केली तसेच त्यांचे त्या वेळचे इतिहास विषयाचे प्राध्यापक आर. डी. गायकवाड यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. या वेळी संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, सचिव विकास देशमुख, पदाधिकारी, प्राचार्य, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य व कर्मचारी उपस्थित होते.**



## वाशीच्या मॉडर्न स्कूलमध्ये शांतता यात्रा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

स्वछता ही सेवा उपक्रमांतर्गत रयत शिक्षण संस्थेच्या मॉडर्न स्कूल, वाशी येथे शांतता यात्रा काढण्यात आली होती. या वेळी विद्यार्थ्यांनी स्वच्छतेची शपथ घेतली.

या उपक्रम अंतर्गत २ ऑक्टोबरला राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त मॉडर्न स्कूलच्या स्काऊट गाईड, आरएसपी व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विद्यालय परिसर स्वच्छ केला. तसेच शांतता यात्रा काढली.

या वेळी विद्यालयाच्या हना मॅडम, मनीषा सकपाळ, मुख्याध्यापक रवींद्र वाघ, स्काऊट गाईडचे मास्टर आबासाहेब वाघ, शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.






# आरक्षणासाठी रायगडातील धनगर समाज एकवटला

## जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन सादर

**अलिबाग : प्रतिनिधी**

'धनगर समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गात आरक्षण द्या' या मागणीसाठी रायगड जिल्ह्यातील धनगर आरक्षण कृती समिती आणि सकल धनगर समाजातर्फे मंगळवारी (दि. ३) रायगड जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. आपल्या विविध मागण्यांचे निवेदन सकल धनगर समाजाने जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे.

जिल्हा परिषदेच्या शिवतीर्थ इमारतीपासून मोर्चाला सुरुवात झाली. हिराकोट तलावाजवळ मोर्चा पोलिसांनी अडवला. यानंतर मोर्चाचे रुपांतर छोटेखानी सभेत झाले. धनगर समाजाच्या संघटना प्रमुखांनी या वेळी उपस्थित बांधवांना संबोधित केले. यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन शिष्टमंडळाने आपल्या मागण्यांचे निवेदन दिले.




धनगर समाजाचा घटनेमधील अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करण्यात आला आहे, पण गेली ७५ वर्षे त्याची अंमलबजावणी झालेली नाही. यामुळे समाजातील मुलांना सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय आरक्षणाचा लाभ मिळू शकलेला नाही. ५० दिवसांत धनगर समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गातील आरक्षण लागू करावे, असे या निवेदनात म्हटले आहे.

या मोर्चामध्ये धनगर समाजाचे लक्ष्मण ढेबे, मधुकर ढेबे, धाऊ ढेबे, रमेश बावदाने, संतोष आखाडे, रामभाऊ केंडे, विलास ढेबे, राजू आखाडे, जनार्दन ढेबे आदी या मोर्चात सहभागी झाले होते.

# रोह्यात ५१ रुग्णांना मिळाली नवी दृष्टी

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा सिटिझन फोरम ट्रस्ट आणि आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल, नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात १२८ रुग्णांची तपासणी करण्यात आली. ५१ रुग्णांवर तातडीने शस्त्रक्रिया करण्यात आली. उर्वरित रुग्णांच्या शस्त्रक्रिया बुधवारी करण्यात येणार आहेत.

या वेळी अल्पदरात चष्मे वाटपही करण्यात आले. शंकरा आय. हॉस्पिटलचे टीम मॅनेजर प्रकाश पाटील, डॉ. क्षमा, किर्ती परब, भारती तांदले, निशा शिंदे, समृद्धी उतेकर, अमर पोकळे, कल्पेश सावंत आदींनी रुग्णांची तपासणी केली.

फोरमचे अध्यक्ष नितीन परब, निमंत्रक अप्पा देशमुख, मिलिंद अष्टिवकर, महेश सरदार, संदीप सरफळे, श्रीकांत ओक, इल्यास डबीर, दिनेश जाधव, प्रशांत देशमुख, उस्मान रोहेकर, परशुराम चव्हाण, अमोल देशमुख, शैलेश रावकर, सिद्धेश ममाले, दिनेश मोहिते, समिधा अष्टिवकर, रिद्धी बोथरे आदी उपस्थित होते.

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग**

**कार्यकारी अभियंता, खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग, पेण, रायगड**

खाचरखिंड, गजानन महाराज मंदिराजवळ, उंबर्डे, ता. पेण. जि. रायगड

ई-मेल - rdwrdeekldpen@gmail.com दुरध्वनी - ९४०५६८६८९०

''डिजिटाईज्ड कालबध्द सेवा वर्ष २०१५''

**जा.क्र. खाभूसवअवि/लेशा/शुध्दीपत्रक/१७३६/२०२३** **दिनांक :- २६.०९.२३**

विषय :- खारगांव खारभूमी योजना, ता. म्हसळा या कामाच्या निविदेअंतर्गत जिओ टॅगिंगमधील बदल.

संदर्भ :- ई निविदा सूचना क्र. ०१ सन २०२३-२४ पत्र जा. क्र. खाभूसव अवि/ले-१/१६७७, दि. ११.०९.२०२३

**शुध्दीपत्रक क्र. १**

उपरोक्त विषयान्वये या कार्यालयाकडून खारगांव खारभूमी योजना, ता. म्हसळा या योजनेच्या नुतनीकरणाचे कामाची निविदा प्रसिध्द करणेत आलेली होती. तरी सदरील कामाच्या प्रारूप निविदा (DTP) मध्ये नमूद केलेल्या जिओ टॅगिंग मधील अक्षांश व रेखांश मध्ये अंशतः बदल व वाढ करणेत येत आहे. व ते खालीलप्रमाणे वाचण्यात यावेत. तसेच सदरील निविदेचा कालावधी हा दि. २०.०९.२०२३ ते ०४.१०.२०२३ असा होता परंतु सदरील कालावधी हा दि. २०.०९.२०२३ ते ०६.१०.२०२३ एवढा करणेत येत आहे. तसेच निविदेचा प्रथम लखोटा दि. ०९.१०.२०२३ रोजी उघडणेत येईल.

| अ.क्र. | ठिकाण | अक्षांश | रेखांश | जिओ टॅगिंग करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | बांध | १८.१४३२ | ७३.१०३१ | २९.०९.२०२३ व |
| २. | उघाडी | १८.१४४२ | ७३.१०३५ | ०३.१०.२०२३ ते |
| ३. | खाण | १८.२१६८ | ७३.२२७६ | ०६.१०२०२३ |

**सही/-**
**(सु. ह. सावंत)**
कार्यकारी अभियंता
खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग
पेण- रायगड

# उसर गेल कंपनीसमोरील रस्त्याची दुरवस्था

**रेवदंडा : प्रतिनिधी**

वर्दळीचे ठिकाण असलेले उसर गेल इंडिया कंपनी गेटसमोरील रस्त्याची पुरती दुरवस्था झाली आहे. रस्त्यावर खड्डेच खड्डे पडले असून पावसाचे पाणी साचून तेथे तळी निर्माण झाली आहेत. त्यामुळे वाहनचालकांसह पादचाऱ्यांनाही त्रास सहन करावा लागत आहे.

उसर गेल इंडिया कंपनीसमोरील हा रस्ता वर्दळीचा आहे. रोज येथून अलिबाग-रोहा तसेच रोहा-अलिबाग मार्गातील लहान मोठी वाहने जा-ये करीत असतात. शिवाय गेल इंडिया कंपनीत जा-ये करणाऱ्या अवजड वाहनांची संख्याही मोठी आहे.

या रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी माती टाकण्यात आली आहे, मात्र पाऊस पडल्याने हा रस्ता या मातीने चिखलमय होत असतो. त्यामुळे या रस्त्यावरील खड्डे भरण्याची मागणी जोर धरीत आहे.



MAHATRANSCO

**EXTENSION TO SRM E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender

| Specification | |
|---|---|
| Tender No. : E-Tender -04/2023-24 **Name of Tender** : Extension to E-Tender for the work of repair & maintenance of high mast lighting tower alongwith consumable material at Major Stores, Panvel for FY 2023-24. **Tender Fee :- Rs. 500 /- + applicable GST.RFx No.- 7000028640** | **Online Downloading the RFx :** Dt.04.10.2023, 00:00 Hrs. to 10.10.2023, 23:59 Hrs.**Online Submission of the RFx :** On or Before Dt. 10.10.2023, 23:59 Hrs. **Online Opening of the Techno Commercial RFx :** Dt. 11.10.2023, at 11:00 Hrs. (If possible). **Online Opening of the Price bid:** Dt. 11.10.2023 at 15:00 Hrs. (If possible) |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in** Contact Person: -The Executive Engineer, Mobile No. 9930057633 **Note** : All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Executive Engineer (I/C)**
**Major Stores, Panvel**

# विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील मोरगिरी गावातील राजिप शाळा फौजदारवाडी व चिरेखिंड शाळेत धैर्य सामाजिक संस्थेमार्फत शालेय साहित्य, पुस्तके वाटप करण्यात आले. या उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष ओंकार उतेकर, सदस्या तृप्ती उतेकर, मुख्याध्यापक ज्ञानोबा रेणोसे, निलिमा शिंदे, प्राची शिंदे, मेघ वाडकर, सुधीर जाधव उपस्थित होते.

# हिरवळ महाविद्यालयात महापुरुषांना अभिवादन

**माणगाव : प्रतिनिधी**

राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी व हिरवळ रात्र महाविद्यालयात अभिवादन करण्यात आले.

या वेळी प्राचार्य सुदेश कदम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, तसेच माजी पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांच्या कार्याविषयी उपस्थितांना संबोधित केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी आंतरराष्ट्रीय अहिंसा दिनाचे औचित्य साधून अहिंसेची शपथ घेतली. राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आजीवन अध्ययन विस्तार विभागाच्या स्वयंसेवकांनी महाविद्यालय व परिसरात स्वच्छता श्रमदान केले.

MAHATRANSCO

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| **Tend-35/23-24 7000028658** | Work of replacement of old split air conditioner units by variable refrigerant flow AC system at 400kV R.S. Kharghar under EHV (O&M) Circle, Panvel. | **Rs. 79.33 Lakhs** |

**EMD 1% of estimated cost, Submission of bids from 03.10.2023 to 11.10.2023 at 11:00 hrs, Opening date: 11.10.2023 at 11:30 Hrs. Tender Fee- Rs. 500/-+ GST** each tender. For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** Contact Person: The Executive Engineer(Adm) **Tel No. 022-27459624**, Mob. No. **9769006131**. E-mail ID se7200@mahatransco.in

**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

MAHATRANSCO

**TENDER EXTENSION NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors/agencies on Mahatransco E- Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following work

**Tender No.: EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/Ten-7/23-24 (RFX No. 7000028585)** — **Period for submission of E-Bid: 03.10.2023 to 10.10.2023 up to 23:59hrs**

Name of Work: Extension of existing SECURITRON make Fire Detection and Alarm System to 33kV GIS room at 400kV RS, Kharghar

| Estimated Cost: | EMD(Rs.) | Tender fee(Rs.): | Closing date | Technical opening date | Commercial opening date |
|---|---|---|---|---|---|
| Rs. 5,31,308.57/- (Including GST) | Rs.5,313.09/- | Rs.590/- including GST | 10.10.2023 up to 23:59 hrs | 11.10.2023 at 10:00 hrs (If possible) | 11.10.2023 at 10:15 hrs (If possible) |

**Contact Persons**: 1) Mr. S.J.Darekar, Executive Engineer-Charge, 400kV RS O&M Dn., Kharghar, 9619892040 2) Ms. P.C.Deshpande, Dy.EE (O), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9819313988 For further details visit our website **www.mahatransco.in**

1] Tender documents can be downloaded by only online from aforesaid website. 2] Eligible contractor should submit their bid well in advance instead of waiting till last date. MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems. Note :- All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender portal (New) - **https://srmetender.mahatransco.in.**

**SD/-**
**Executive Engineer (I/C.),**
**400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**

MAHATRANSCO

**RE-E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1. | Tender No. & Name of Tender | **RFx No :-7000028432** Tender No.: **EE/EHV(O&M)/DN/PNL/ Re-e-Tender-49/ 2023-2024.** Rfx Re-e-tender for Work of Repair, Restore & Renovation of Marshaling Kiosk Boxes, Isolator, AC/DC supply, breaker & CT-CVT Kioskalong with strenthening of MBs foundation at 220kV Apta & Bombay dyeing Substation under EHV (O&M) Division Panvel. **Tender amount Limited to Rs. 25,00,000/-, EMD amount Rs. 25,000/-** |
| 2. | Online Downloading theRFx . | **03.10.2023, 18:00 Hrs. to 10.10.2023, 23:59 Hrs.** |
| 3. | Online Submission of the Rfx | **On or Before 10.10.2023 up to 23:59 Hrs.** |
| 3. | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **11.10.2023 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in** Contact Person :- The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410. **Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV (O&M) DN PANVEL**

**महाराष्ट्र शासन**

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. 02145 - 222167**

**निविदा सूचना क्रमांक ६५ सन २०२३-२४**

कार्यकारी अभियंता, महाड (सा. बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन - ४०२ ३०१, दुरध्वनी क्रमांक ०२१४५- २२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा. बां.) विभाग महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरुन) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| ९४८३३९ | पैठण ओंबळी जे जिल्हा हद्द रस्ता प्रजिमा ७२ कि.मी. २/०० ते ११/३०० मध्ये रस्त्याची सुधारणा करणे. ता. पोलादपुर जि. रायगड (५०५४ रस्ते व पुल ०४ इतर जिल्हा मार्ग) | ५,१७,२२,९३५/- | २,६०,०००/- | ३,५५४०/- | ६ महिने | आवश्यकता नाही |
| ९४८३४० | रायगड जिल्हयातील पोलादपुर तालुक्यातील पोलादपुर देवपुर गोळेगणी कुडपण रस्ता प्रजिमा ७१ वरील कि मी ८/०० पासुन कोंडवी धामणदेवी महारगुळ रस्ता प्रजिमा ९९ ला जोडणाऱ्या रस्त्याचे बांधकाम करणे ता पोलादपुर जि. रायगड (५०५४ रस्ते व पुल, ०४ इतर जिल्हा मार्ग) | ३,८२,९१,६९८/- | १,९२,०००/- | २,३६०/- | १२ महिने | आवश्यकता नाही |
| ९४८३४१ | उसरोली तळेखार रोहा कोलाड विळे ताम्हाणी घाड रस्ता प्र.रा.मा. ०५ कि.मी. ६७/३०० ते ६७/५०० मध्ये संरक्षक भिंत बांधणे ता माणगाव जि. रायगड (५०५४ रस्ते व पुल, ०३ राज्य मार्ग) | २,०४,९३,६४२/- | १,५०,०००/- | २,३६०/- | ६ महिने | आवश्यकता नाही |
| ९४८३४२ | म्हाप्रळ आंबेत पुरार रस्ता रा मा १०१ किमी ४/१०० ते ४/३०० मध्ये संरक्षक भिंत बांधणे ता. माणगाव जि. रायगड (५०५४ रस्ते व पुल, ०३ राज्य मार्ग) | १,५५,९५,६४०/- | १,५०,०००/- | १,१८०/- | ६ महिने | आवश्यकता नाही |
| ९४८३४४ | म्हाप्रळ आंबेत पुरार रस्ता रा मा १०१ कि मी ५/८०० ते ६/२०० मध्ये संरक्षक भिंत, ब्रेस्ट वॉल व पक्के गटार बांधणे ता माणगाव जि. रायगड (५०५४ रस्ते व पुल, ०३ राज्य मार्ग) | १,५०,६३,९५०/- | १,५०,०००/- | १,१८०/- | ६ महिने | आवश्यकता नाही |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **२९/०९/२०२३** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **१३/१०/२०२३** वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | निविदापूर्व बैठक | मा.मुख्य अभियंता,सा.बां. प्रादेशिक विभाग, कोकण यांचे कार्यालयात दिनांक ०३/१०/२०२३ वेळ १२.०० वाजता. **अ.क्र. १ ते २ साठी** मा. अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **०३/१०/२०२३** वेळ **१२.०० वाजता. अ.क्र. ३ ते ४ साठी** |
| ३ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **१६/१०/२०२३** वेळ **१२.०० वाजता.** |

**टिप :-** परिपूर्ण निविदा या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र. मवि/लेशा/निविदा/४४४२**
**दिनांक : २६/०९/२०२३**

**सही/**
कार्यकारी अभियंता
महाड (सा.बां.) विभाग , महाड करिता

सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा/वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ता. पनवेल, जि. रायगड | | | | | | | | |
| १. | करंजाडे ७४७ | III/KRJD/SR- १२/२४ | १२१/१अ | ०-३०-० | २०० चौ.मी. | **मौजे करंजाडे भुखंड क्र. ३८/A, सेक्टर - १, क्षेत्र - १९९.९९ चौ.मी.** | जमिनीपोटी **कै. श्री. शंकर गणू गायकर (मयत)** यांचे वारस १) श्रीमती विमल रत्नाकर म्हात्रे २) श्रीमती दुर्गाबाई शंकर गायकर ३) श्रीमती बेबीबाई उर्फ लक्ष्मी विष्णू शेंदरे ३) श्रीमती वासंती मधुकर पाटील | निरंक |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निर्दशनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :-** **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**सिडको भवन, तळ मजला**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४**

अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी

CIN - U99999 MH 1970 SGC-014574

**www.cidco.maharashtra.gov.in**

सिडको/जनसंपर्क/३२९/२०२३-२४

# गौरा गणेश दर्शन

















पनवेल : भाजप मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सोमवारी पनवेल, तक्का येथील साखरचौथीच्या म्हणजेच गौरा गणपतींचे दर्शन घेतले. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, सरचिटणीस अमरीश मोकल, संजय जैन, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, अजय बहिरा, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, नीता माळी, प्रभाग क्रमांक १८चे अध्यक्ष पवन सोनी, निलेश पाटील, सुमित झुंजारराव, प्रवीण मोहोकर यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते, भाविक उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत करण्यात आले, तर मंगळवारी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल, नवीन पनवेल, सुकापूर, कळंबोली, दापोली, ओवळे येथील बाप्पांचे दर्शन घेतले. त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी भाजप जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, शहर सरचिटणीस अमरीश मोकल, माजी जि.प. सदस्य अमित जाधव, प्रिया मुकादम, माजी नगरसेवक बबन मुकादम, अमर पाटील, माजी नगरसेविका सुशीला घरत, प्रमिला पाटील, भाजप कळंबोली शहराध्यक्ष रविनाथ पाटील, जगदीश घरत, सदाशेठ गायकवाड, राकेश गायकवाड, के. ए. म्हात्रे, सुभाषशेठ म्हात्रे, गजानन पाटील, संजय गायकवाड, समीर कटेकर, गोवर्धन डाऊर, मनखूश नाईक, रोशन जितेकर, सदन डाऊर, विष्णू घोपरकर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, भाविक उपस्थित होते.


















श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल आणि
भारतीय जनता पार्टी, पनवेल व रायगड मेडिकल असोसिएशन
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

विनामूल्य आरोग्य तपासणी
आणि मोफत औषधोपचार शिबीर

पनवेल शहरातील व तालुक्यातील वैद्यकिय तज्ञांमार्फत

• तज्ञ डॉक्टरांचा सल्ला
• तपासणी-चाचणी व मोफत औषधोपचार

• आयुष्यमान भारत डिजिटल कार्ड (आभा कार्ड) तयार करुन देण्यात येईल.
• दिव्यांगांना प्रमाणपत्र वाटप
• अवयवदानाचे फॉर्म भरण्याची सुविधा.

डोळयांची मोफत तपासणी
व मोफत चष्मे वाटप

रविवार दि. ०८ ऑक्टो. २०२३
स. ०९:०० ते दु. ०२:०० वाजेपर्यंत

स्थळ : चांगू काना ठाकूर आर्टस्, सायन्स, कॉमर्स महाविद्यालय, खांदा कॉलनी, नवीन पनवेल.

• सर्वसाधारण रोग तपासणी • बालरोग तपासणी • महिलांचे आजार तपासणी • त्वचारोग तपासणी • हृदयरोग तपासणी • दंतरोग तपासणी • हाडांचे रोग तपासणी • ईसीजी तपासणी • मधुमेह तपासणी • नाक कान-घसा तपासणी • आयुर्वेदिक तपासणी • होमिओपॅथिक तपासणी • कर्करोग तपासणी • क्षयरोग तपासणी • सर्व प्रकारच्या रक्त तपासण्या मोफत करण्यात येणार आहेत.

शिबिरात येणाऱ्या सर्व रुग्णांची तज्ञांमार्फत तपासणी करुन मोफत औषधे दिली जाणार आहेत, डोळयांची तपासणी करुन गरजू व्यक्तींना मोफत चष्मे वाटप करण्यात येणार आहेत. तसेच अपंगांना तीन चाकी सायकल वाटप तसेच कर्णबधिरांसाठी श्रवणयंत्र देण्यात येणार आहेत. तरी पनवेल तालुक्यातील व पनवेल शहरातील सर्व गरिब व गरजू व्यक्तींनी या महाआरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा, हि विनंती.

सहभागी संस्था

जे.जे. हॉस्पिटल, मुंबई, लक्ष्मी आय इन्स्टिट्यूट पनवेल, एम.जी.एम. हॉस्पिटल कामोठे व कळंबोली, डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटल नेरुळ, भारती विद्यापीठ खारघर, मेडीकव्हर हॉस्पिटल खारघर, तेरणा मेडिकल कॉलेज नेरुळ, येरला मेडिकल ट्रस्ट, खारघर, साईट फर्स्ट केअर, नायर हॉस्पिटल, व्हिट सेंटर पनवेल, शंकरा आय हॉस्पिटल, सत्य साई संजिवनी हॉस्पिटल खारघर.

अधिक माहितीसाठी संपर्क:

डॉ. अरुणकुमार भगत ९२२३५०५५५५
डॉ. कृष्णा देसाई ९३७२६३५४४३
श्री. अनिल कोळी ९७६९४०९१६१
डॉ. विजय पाटील ९८९०७३०८९३
डॉ. संतोष आगलावे ९८२०९५११९१
डॉ. विशाल वाणी ९८९२१२९५००

प्रशांत ठाकूर
आमदार, पनवेल विधानसभा

महेश बालदी
आमदार, उरण विधानसभा


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com